Indian Streams Research Journal
Volume I, Issue. X, Nov, 2011
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

नांदेड शहरातील प्राथमिक स्तरावरील शारिरीकदृष्टया अपंग विद्यार्थ्याला येणाऱ्या समस्या : एक अभ्यास

विवेक गंगाधर इनामदार

प्रस्तावना :–

शिक्षण हे एक व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तीमत्व विकासाचे साधन आहे. त्याचबरोबर भारताने स्वातंत्र्यानंतर लोकशाही शानसव्यवस्थेचा स्विकार केलेला आहे. 7 ते 14 या वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी घटनेच्या कलम 45 तर शिक्षण हा एक मुलभूत हक्क म्हणून स्विकारला आहे. शिक्षण सर्वांना मिळावे म्हणून अनेक प्रयत्न आजपर्यंत केलेले दिसून येतात. सर्वशिक्षा अभियान, एकात्मीक अपंग शिक्षण, वंचिताचे शिक्षण, सर्वसमावेशीत शिक्षण, विषेश शाळांची निर्मीती या सर्व प्रयत्नातून शिक्षणाच्या प्रवाहात सर्वांना सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. अनेक विशष बालके शिक्षणापासून दूर राहताना आजही दिसून येतात.

संशोधनाची गरज व महत्वः–

शिक्षण हा भारतीय जनतेचा मुलभूत हक्क असल्यामुळे शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे. म्हणजेच शारीरिक दृष्टया अपंग असलेल्या विद्यार्थ्यांना सुध्दा शिक्षण मिळाले पाहिजे. त्यांच्या शिक्षणातील अडचणी समजून घेण्याची गरज निर्माण झाली आहे. वंचित घटकांतील सर्व विद्यार्थ्यांना असलेल्या शैक्षणिक अडचणी लक्षात घेवून त्यावर उपाययोजना करण्याची गरज वाटते. शारीरिकदृष्टया अपंग असलेल्या बालकांना परिणामकारक शिक्षण देण्याची गरज निर्माण झाली आहे. शारीरिकदृश्टया अपंग बालकांना शैक्षणिक सुविधा देवून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अनुकूल परिस्थीती निर्माण करणे हे शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या काळात आवश्यक बनले आहे. संबंधीत संशोधनामुळे शारिरीकदृष्टया अपंग बालकाच्या समस्या कोणत्या आहेत हे कळण्यास मदत होणार आहे. संबंधित संशोधन कार्यामुळे शारिरीकदृष्टया अपंग बालकांच्या शैक्षणिक समस्यावर उपाययोजना करण्यास मदत होईल. त्याचबरोबर शारिरीकदृष्टया अपंग बालकास मिळणाऱ्या शासनाकडूनच्या व शाळेकडूनच्या सुविधा समजण्यास मदत होईल.

समस्या विधान :–

'' नांदेड शहरातील प्राथमिक स्तरावरील शारिरीकदृष्टया अपंग विद्यार्थ्याला येणाऱ्या समस्या : एक अभ्यास.''

कार्यात्मक व्याख्या :–

- **नांदेड** :–मराठवाडा विभागातील एक जिल्हा.

•प्राथमिक स्तर :– नविन आकृतीबंधानुसार पुर्व प्राथमिक वर्ग वगळुन इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यंतचा स्तर.

•अपंग एकात्म शिक्षण योजना :– केंद्र शासन व स्वयंसेवी संस्था यांच्या प्रयत्नाने या शाळा अस्तित्वात आल्या आहेत. सौम्य प्रकारच्या अपंग विद्यार्थ्यात सामान्य मुलाबरोबर सामान्य शाळेतून शिक्षण देणाऱ्या योजनेला अपंग एकात्म शिक्षण योजना असे नाव देण्यात आले.

शारिरीकदृश्टया अपंग बालक :

''शारिरीक अवयवामध्ये हात, पाय, हाडे, कंबर, बोटे इ. च्या बाबतीत असलेले पुर्णतः व काही अंशी अपंगत्व किंवा अकार्यक्षमता या प्रकारातील बालकांचा समावेश संशोधकाने शारिरीकदृष्टया अपंग बालकांमध्ये केलेला आहे.

– अपंग एकात्मिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य शिक्षक प्रशिक्षण व संशोधन मंडळ पुणे, 2008

Please cite this Article as :विवेक गंगाधर इनामदार , नांदेड शहरातील प्राथमिक स्तरावरील..... **: Indian Streams Research Journal (Nov. ; 2011)**

संशोधनाची उद्दिश्टे :——

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने काही उद्दिष्टांचा समावेश संशोधन करताना केलेला आहे.

1)शारीरिकदृष्टया अपंग बालकांच्या शैक्षणिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
2)शारीरिकदृष्टया अपंगत्व असलेल्या बालकांची ओळख करून देणे.
3)शारीरिकदृष्टया अपंगत्व असलेल्या बालकांच्या शैक्षणिक समस्या शोधणे.
4)शारीरिकदृष्टया अपंगत्व असलेल्या बालकांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा शोध घेणे.
5)शारीरिकदृष्टया अपंगत्व असलेल्या बालकांच्या शैक्षणिक समस्यावर उपाय शोधणे.

परिकल्पना :–

शारीरिकदृष्टया अपंग बालकांची शैक्षणिक पार्श्वभूमी फारशी शिक्षणासाठी अनुकूल नाही.

1)शारीरिकदृष्टया अपंग बालकांना त्यांच्या शैक्षणिक संपादणूकीत त्यांचे शारीरिक अपंगत्व आड येते.
2)शारीरिकदृष्टया अपंगत्व असलेल्या बालकांना शासनाकडुन दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक सुविधा फारशा प्रमाणात दिल्या जात नाहीत.
3)शारीरिकदृष्टया अपंग बालकांची शैक्षणिक संपादणूक फारशी उच्च प्रकारची नाही.
4)नांदेड शहरात शारीरिकदृष्टया अपंग बालकांची संख्या बऱ्याच प्रमाणात आहे.
5)शारीरिकदृष्टया अपंग बालकांना शैक्षणिक समस्या शिक्षणातील विविध क्षेत्रातून जाणवतात.

संशोधनाची गृहितके :–

संशोधकाने संबंधीत संशोधनाचे कार्य करीत असताना खालील काही गृहितके गृहित धरली आहेत.

1)शारीरिकदृष्टया अपंग असलेल्या बालकांना शैक्षणिक समस्या विविध प्रकारच्या असतात.
2)शारीरिकदृष्टया अपंग असलेल्या बालकांची संख्या नांदेड शहरामध्ये बऱ्याच प्रमाणात दिसून येते.
3)शारीरिकदृष्टया अपंग असलेल्या बालकांना शासनाकडुन बऱ्याच प्रमाणात शैक्षणिक मदत केली जाते.
4)शारीरिकदृष्टया अपंगत्व असलेल्या बालकांच्या शैक्षणिक समस्यावर उपाय शोधता येतात.

संशोधनाची व्याप्ती :–

1)संबंधीत संशोधनाची व्याप्ती नांदेड शहरातइतकीच मर्यादीत आहे.
2)संबंधीत संशोधन हे फक्त प्राथमिक स्तरावरील म्हणजेच इयता 1 ली ते 7 वी चे विद्यार्थी संशोधनासाठी निवडल्यामुळे या संशोधनाची व्याप्ती इयता 1 ली ते 7 वी च्या विद्यार्थ्यांपुरतीच मर्यादीत आहे.
3)संबंधीत संशोधन हे शारीरिकदृष्टया विकलांग बालकापर्यंत मर्यादीत आहे.
4)संबंधीत संशोधन हे शैक्षणिक वर्ष 2012 पुरतेच मर्यादीत आहे.
5)संबंधीत संशोधनामध्ये शारीरिकदृष्टया विकलांग विद्यार्थ्याच्या शैक्षणिक अंगाने विचार केला तर सामाजिक व आर्थिक बाजुकडे दुर्लक्ष केले आहे.

संशोधनाची मर्यादा :–

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी खालील मर्यादा लक्षात घेतल्या आहेत.

1)संबंधीत संशोधन हे नांदेड शहरातपुरतेच मर्यादीत आहे.
2)संबंधीत संशोधनात संशोधकाने केवळ शारीरिकदृष्टया अपंग बालकाचाच अभ्यास करण्याचे ठरविले आहे.
3)संबंधीत संशोधनात केवळ शैक्षणिक समस्येचा अभ्यास करण्याचे संशोधन कार्यात ठरविले असून यामध्ये सामाजिक व आर्थिक समस्येचा अभ्यास केला जाणार नाही. इ. संबंधीत संशोधनाची मर्यादा आहे.

संशोधन पध्दती:

हे संशोधन कार्य करण्यासाठी सर्वेक्षण या पध्दतीची निवड केली आह

.

संशोधनाची साधने :–

संबंधीत संशोधन कार्यामध्ये संशोधकाने प्रश्नावली या साधनाचा वापर करून माहितीचे संकलन केले आहे.

जनसंख्या व न्यादर्श :–

नांदेड शहरातील एकूण प्राथमिक स्तरावरील शाळेतील सर्व शारीरिकदृष्टया अपंग विद्यार्थी या संशोधनाची जनसंख्या आहे. प्राथमिक स्तरावरील नांदेड शहरातील 05 शाळांमधील शारीरिकदृष्टया अपंग 25 विद्यार्थी निवडले आहेत. हे प्रत्येक शाळेतून प्रत्येकी 5 विद्यार्थ्याची निवड केली आहे. तसेच प्रत्येक शाळेतून एक शिक्षक निवडलेला आहे. अशाप्रकारे एकूण न्यादर्श 30 एवढा आहे.

निष्कर्ष :

शारीरिकदृष्टया अपंग बालकांचे पालक मोठया प्रमाणात अशिक्षीत आहेत.

1)शाळेमध्ये शारीरिकदृष्टया अपंग बालकांना शिकविण्यासाठी मुबलक साधन सामुग्री नाही.
2)शाळेमध्ये शारीरिकदृष्टया अपंग बालकांना जाण्या येण्याची अडचण आहे.
3)शासनाकडून मिळणाऱ्या योजना शैक्षणिक सुविधा शारीरिकदृष्टया अपंग बालकांसाठी पुरेशा नाहीत.
4)शारीरिकदृष्टया अपंग बालकांना शरीराच्या हात व पाय या भागात अंपगत्व असणारे मुले अधिक आहेत.
5)शारीरिकदृष्टया अपंग बालकांमध्ये न्युनगंडाची व संकुचिततेची भावना असते.
6)शारीरिकदृष्टया अपंग बालकांना शिक्षण घेताना दरिद्रता व आत्मविश्वासाचा अभाव आढळून येतो.
7)शारीरिकदृष्टया अपंग बालकांना त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता संपादणुकीमध्ये त्यांच्या सर्व अडचणी कारणीभूत ठरतात.

8)शाळेमध्ये सांस्कृतिक उपक्रमाव्यतीरिक्त इतर उपक्रम घेतले जात नाहीत.
9)शारीरिकदृष्टया अपंग बालकांचे शाळेत मन रमत नाही.
10)शारीरिकदृष्टया अपंग बालके शिक्षकांच्या शिकविण्याने समाधानी होत नाहीत.
11)शाळेमध्ये मुलांना व्यवसायिक शिक्षण दिले जात नाही.

शिफारशी :
1)शारीरिकदृष्टया अपंग बालकांसाठी शाळेमध्ये मुबलक साधन सामुग्री असावी.
2)शासनाने अपंग मुलांच्या विकासासाठी सुविधांमध्ये वाढ करावी.
3)शासनाने शारीरिकदृष्टया अपंग बालकांच्या शिष्यवृत्ती रक्कम पुरेशा प्रमाणात दयावी.
4)शाळेमध्ये मुलांना सर्व प्रकारचे व्यवसायिक शिक्षण दयावे.
5)शारीरिकदृष्टया अपंग बालकांच्या शिक्षणासंबंधी लोकजागृती घडवूण आणण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवावेत.
6)शारीरिकदृष्टया अपंग बालकांच्या न्युनगंडाची भावन दुर करण्यासाठी शिक्षकांनी वेळोवेळी प्रोत्साहन दयावे.
7)शारीरिकदृष्टया अपंग बालकांना त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता संपादणुकीत वाढ करण्यासाठी सहानुभूती दयावी.
8)शारीरिकदृष्टया अपंग बालकांचा सहभाग शाळेमधील विविध उपक्रमामध्ये वाढवावा.
9)शिक्षकांनी शारीरिकदृष्टया अपंग बालकांकडे विशेष लक्ष दयावे.
10)शारीरिकदृष्टया अपंग बालकांविशयी लोकजागृती घडवून आणण्यासाठी वैद्यकीय शिबिराचे आयोजन करावे.
11)शारीरिकदृष्टया अपंग शाळेतील शिक्षक प्रशिक्षीत असावेत.
12)शारीरिकदृष्टया अपंग बालकांच्या शिक्षकांसाठी सेवांतर्गत उद्‌बोधन शिबिरे शासनाने आयोजित करावेत.

संदर्भग्रथ सुची
1)बापट भा. गो. (1994) शैक्षणिक संशोधन पध्दती, सूविचार प्रकाशन, पुणे
2)भितांडे वि. रा. (1994) शैक्षणिक संशोधन पध्दती, नूतन प्रकाशन, पुणे
3)माळी एम. जी. (1971) एकशिक्षकी शाळा – तंत्र व मंत्र, निलकंठ प्रकाशन, पुणे
4)मुळे रा. शं. आणि उमाठेवि.तु.शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,नागपुर – 01
5)महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई. (2005) शाळाबाहय मुलांसाठी पर्यायी शिक्षण व्यवस्था.
6)वर्तक चंद्रकांत संशोधनातील लेखन शैली (पुष्पा तेरावे) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक – 05
7)संत दु. का. संशोधन पध्दती, प्रक्रिया व अंतरंग, विद्यार्थी गृह प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे
8)Best J. W. Kann J, V, Research in Education (IV Edi) Prentice Hall of India P. Ltd., New Delhi
9)सर्व शिक्षा अभियान, सर्व समावेशक शिक्षण, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे – 30, 2005 पेज नं. 13, 22, 23, 25